## दाव्यातील नि.क्र. ३९ वरील आदेश

## (पारित दिनांक १० ऑक्टोबर,२०२२)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे कथन असे आहे की, सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत ही सध्या धरणग्रस्तांचे पुनर्वसनाकरीता राखीव राहिलेली नाही, तसा ७/१२ वरील असणारा शेरा कमी करण्याची प्रक्रिया चालु झाल्याने प्रस्तुत दाव्यात दुरुस्ती करणे गरजेचे झालेले आहे. तसेच दाव्यामध्ये नमुद साठेखत हे बिनताब्याचे असल्याकारणाने त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास आजतागायत म्हणणे न दिल्याकारणाने त्यांचेविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

०४. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदाराचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराचे कथन व पटलावरील कागदपत्रे पाहता वाद मुद्दे निश्चित करुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी अर्जामध्ये सुचविलेली दुरुस्ती करुन मिळणेस पात्र आहेत काय? | ... होकारार्थी |
| २) | आदेश काय? | अर्ज मंजुर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### वाद मुद्दा क्रमांक १ करिताः

०५. अर्जदार यांनी प्रस्तुतचा दावा साठेखतावरुन खरेदीखत होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, दावा मिळकत गट नं.३५ क्षेत्र ०१ हे २० आर च्या ७/१२ उता-यावर भोगवटा वर्ग १ लिहिलेले आहे. परंतु, इतर हक्कात धरणग्रस्तांचे पुनर्वसनासाठी राखीव असा शेरा नमुद आहे. सदर शेरा कमी करण्याची प्रक्रिया सुरु झाल्याचे त्यांना समजले आहे. तसेच दाव्यामध्ये नमुद साठेखत हे बिनताब्याचे साठेखत असल्याकारणाने प्रस्तुत कामी त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिलेला आहे. वादी यांचे

म्हणण्याप्रमाणे दाव्यामधील कलम ९ मध्ये ९ब या क्रमांकानंतर ९ब/1 असा क्रमांक नमुद करुन त्यापुढे मजकुर नमुद करण्याकरीता परवानगी मागितलेली आहे. प्रस्तुतचे काम हे वादीचे पुराव्याकरीता प्रलंबित असल्याचे दिसुन येते.

०६. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी त्यांचे दिलेल्या अर्जामधील कथनांचा विचार करता दावा मिळकतीचे वर्णनामध्ये बदल झाल्याकारणाने त्यांना प्रस्तुत दाव्यामध्ये त्याअनुषंगाने दुरुस्ती करण्याची आहे. कायदयातील प्रचलित तरतुदीनुसार दाव्यामध्ये कोणत्याही टप्प्यावर पक्षकारांच्या दरम्यान असलेले वाद अंतिमतः निकाली काढण्याकरीता दुरुस्ती करता येवु शकते. अर्जदारांनी सुचविलेली दुरुस्ती कायद्यांर्तगत असुन सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या कथनास कोणतेही हानी पोहोचत नाही. याउलट दाव्याचे अंतिम निकाल गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. परंतु, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी सन २०११ मध्ये दाखल केलेला आहे. यावरुन वादी यांनी सदर दावा मिळकतीबद्दल तसेच दाव्यात नमुद साठेखताबद्दल योग्य ती माहिती दावा दाखल करतांना नमुद करणे गरजेचे होते. परंतु तसे न केल्याने वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र असुन परिणामतः वाद मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मी, खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेः

## आदेश

१. नि. ३९ वरील अर्ज खर्चासह मंजुर करणेत येत असुन प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५००/- वादी यांनी प्रतिवादींना एकत्रीतरित्या दयावा.

२. अर्जदार यांनी अर्जातील सुचविलेली दुरुस्ती दाव्यामध्ये आजपासुन १४ दिवसांचे आत किंवा पुढील नेमलेल्या तारखेपुर्वी करावी, तसेच दुरुस्त दाव्याची प्रत दुरुस्ती केलेच्या दिवशी दाखल करावी.

३. दोन्ही बाजुंनी आदेशाची दखल घ्यावी.

सही/-

**(जी.ए.कुलकर्णी)**

४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दौंड,
ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाणः दौंड,
दिनांक १०/१०/२०२२.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.S. Mundhe |
| Court | : | G.A. Kulkarni |
| | | 4th Jt.C.J.J.D., Daund, Dist. Pune. |
| Date | : | 10.10.2022 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 10.10.2022 |
| Judgment uploaded on | : | 11.10.2022 |